दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ५१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१५ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज नव्या रुग्णांची संख्या ४० हजारांच्या खाली घसरली, ६९५ मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या २४ तासांत राज्यात ३९ हजार ९२३ नव्या करोना बाधित रुग्णांचे निदान झाले आहे. काल निदान झालेल्या रुग्णांची संख्या ४२ हजार ५८२ इतकी होती. कालच्या तुलनेत नव्या रुग्णसंख्येत काहीशी घट झाली असून असून हा फरक २ हजार ६५९ इतका आहे. तर आज एकूण ५३ हजार २४९ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ही संख्या ५४ हजार ५३५ इतकी होती. याबरोबरच राज्यातील सक्रिय रुग्णांची संख्या ५ लाख १९ हजार २५४ वर आली आहे. आज राज्यात एकूण ६९५ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. काल ही संख्या ८१६ इतकी होती. सध्या राज्यातील मृत्यूदर १.५ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात आज ५३ हजार २४९ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, तर आतापर्यंत एकूण ४७ लाख ०७ हजार ९८० रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ८८.६८ टक्क्यांवर पोहोचले आहे.

# नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचेच नाव द्यावे

## सर्वपक्षीय नेत्यांची एकमुखी मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, अशी मागणी सर्वपक्षीय नेत्यांनी राज्य सरकारकडे येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केली.**



गेली काही दिवस या विमानतळाच्या नावाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्या संबंधी उलटसुलट चर्चा सुरू आहे. दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबईतील विमानतळाला देण्यासाठी सर्वपक्षीय कृती समितीची स्थापना करण्यात आली असून, स्थानिक प्रकल्पग्रस्त, व नेत्यांनी प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई विमानतळाला देण्याची जोरदार मागणी केली आहे. त्या संदर्भात पनवेल शहरातील महात्मा फुले सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस महेंद्र घरत, भूषण पाटील, सहचिटणीस दीपक म्हात्रे, सुरेश पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, मनसेचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत, कार्यकारिणी सदस्य जे. डी. तांडेल, दशरथ भगत, संतोष केणी,के. के. म्हात्रे, निलेश पाटील, नंदराज मुंगाजी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी, नवी मुंबईला विमानतळाला दि. बा. पाटील यांचेच नाव दिले पाहिजे अशी समितीच्या माध्यमातून जोरदार मागणी केली. तसेच वेळ पडल्यास आंदोलने करण्याचा निर्धार त्यांनी अधोरेखित केला. त्यांनी पुढे बोलताना सांगितले कि, या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, अशी मागणी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी जनता सुरुवातीपासून करीत आहे. त्याबाबतचा पत्रव्यवहार राज्य व केंद्र सरकारकडे करण्यात आला आहे. असे असताना अचानकपणे १७ एप्रिल रोजी सिडकोच्या संचालक मंडळाने लोकभावनेचा विचार न करता शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्यामुळे सर्व जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. हे सारे प्रकल्पग्रस्त तसेच सामाजिक व राजकीय संघटनांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावासाठी तीव्र आंदोलन करण्याची भूमिका घेतली आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

त्यांनी पुढे सांगितले कि, २ जानेवारी २०१५ रोजी खासदार कपिल पाटील यांनी लोकभावनेचा विचार करून लोकसभेत ही मागणी केली. त्या संबंधीचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे तत्कालिन अध्यक्ष व सध्याच्या मंत्रीमंडळातील सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव दिला असता त्यांनी तो तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे १९ जून २०१८ रोजी पाठविला. फडणवीस साहेब यांनीसुद्धा तो प्रस्ताव उचित कार्यवाही करण्याच्या सूचनेसह प्रधान सचिव (विमानचालन) यांच्याकडे पाठविला होता. तसे ७ जुलै २०१८ रोजी अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्र्यांनी लेखी कळविलेही होते. तसेच अनेक स्थानिक आगरी-कोळी आणि दहा गाव संघटनांच्या वतीने सिडकोकडेही मागणीही केली होती. पण ही लोकभावना लक्षात न घेता सिडकोने आता जी कृती केली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये सिडकोविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे, असेही पाटील यांनी सांगितले.

नवी मुंबई विमानतळाचे काम पूर्णत्वास आले नसताना आणि कोरोनाचा बिकट काळ सिडकोच्या 'एमडी' नी धिसाडघाईने प्रस्ताव सादर केला. एमडी च्या भूमिकेचा जाहीर निषेधही त्यांनी यावेळी व्यक्त केला. ते म्हणाले की, दि. बा. पाटील यांच्या नावाचा आग्रह सुरुवातीपासूनच प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी जनता आणि राजकीय पक्षाचे नेते करीत आले आहेत. कारण दि. बा. पाटील यांची नवी मुंबई ही कर्मभूमी आहे. इथल्या भुमिपुत्रांना, प्रकल्पग्रस्तांना, कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संबंध आयुष्य वेचले आहे. १९८४ साली शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या व साऱ्या देशभर गाजलेल्या शौर्यशाली लढ्यातून शेतकऱ्यांना साडेबारा टक्के विकसित जमिन देण्याचे तत्त्व जे प्रस्थापित झाले ते पुढे संबंध महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लागू झाले. त्यामुळे दि. बा. पाटील हे साऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे व प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते होते, अशी माहिती दशरथ पाटील यांनी पत्रकारांना दिली.

आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधीमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौमत संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, सीमाप्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरहिरीने भाग घेवून तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे त्यांचे हे कार्य नव्या पिढीला स्फूर्तीदायी ठरावे यासाठी त्यांच्या कर्मभूमीत त्यांची स्मृती जागृत राहावी यासाठी नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी सर्व पक्षाच्या नेत्यांनी, सामाजिक संघटनांनी तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. राज्य सरकारने याचा गांभीर्याने विचार करून दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, अशी मागणी समितीतर्फे दशरथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली.

माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल येथील जनतेच्या मनात नितांत आदर असून, त्यांचे वैक्तिमत्वही उत्तुंग आहे. त्यांचे नाव महाराष्ट्रातील इतर मोठ्या प्रकल्पांना देता येईल. मुंबईत त्यांचे शिवाजी पार्क येथे करोडो रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभे राहत आहे. त्याचे भूमिपुजन अलिकडेच मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले आहे. दिबासाहेब शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार रुजविणारे व्यक्तिमत्व होते. ते येथील जनतेसाठी लढले त्यांचे घरही लोकवर्गणीतून बांधण्यात आले आहे. नव्या मुंबईच्या निर्मितीसाठी व महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांसाठी दि. बा. पाटील यांचे जे योगदान आहे त्याला तोड नाही. म्हणून येथील विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, अन्यथा आंदोलन उभारणार असल्याचा पवित्रा त्यांनी जाहीर केला. व त्यासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न व पाठपुरावा समिति करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

> मी अध्यक्ष होतो त्या काळात प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, स्थलांतर, त्यांना योग्य भरपाई मिळावी अशा पद्धतीची चर्चा व इतर निर्णय घेण्यात आले. कुठलेही प्रकल्प सुरु झाली आणि ती अंतिम टप्यात आल्यानंतर त्या प्रकल्पाचे नामकरण केले जाते. राज्यात एखाद दुसरा त्याला अपवाद असू शकतो पण पूर्णत्वास आल्यानंतर नाव दिले जाते. विमातळाबरोबरच न्हावा शिवडी प्रकल्पाचे काम सुरु आहे. त्या प्रकल्पाला नाव दिले नाही. अनेक प्रकल्प आहेत त्यांना नंतर नाव दिले गेले. मी अध्यक्ष असताना सिडकोच्या संचालक मंडळापुढे नामकरणाचा कुठलाही प्रस्ताव आला नाही. अनेक प्रकल्पग्रस्तांच्या संघटना, पक्ष यांच्या बैठका झाल्या मात्र त्यामध्ये कुठलाही प्रस्ताव आला नाही. कारण नवी मुंबई विमानतळाचे काम पूर्णत्वास आलेच नाही. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव नको यासाठी आमचा संघर्ष नाही तर येथील ९५ गावातील प्रकल्पग्रस्त, स्थानिक नागरिकांना न्याय देण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढणारे भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यात यावा हि आमची आग्रही मागणी आहे.
>
> **आमदार प्रशांत ठाकूर**

## संक्षिप्त...

### वादळाआधी सिंधुदुर्गात मुसळधार पाऊस; पुढचे तीन दिवस धोक्याचे

**दै.रायगड नगरी । सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग:कोकण किनारपट्टीवर चक्रीवादळाचे संकट घोंगावत असताना किनारपट्टीवरील सर्व जिल्ह्यांत प्रशासन ॲलर्ट मोडवर असून आवश्यकती सर्व पावले उचलण्यात येत आहेत. दरम्यान, या वादळाचा सर्वाधिक धोका कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याला असून वादळाआधी आज जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाने धडक दिली. कुडाळ, सावंतवाडी, दोडामार्ग या तालुक्यांत आज मुसळधार पाऊस झाला. जिल्ह्यात पुढील पाच दिवस मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

त्याचवेळी मच्छिमारांनाही समुद्रात न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अरबी समुद्रात दक्षिण-पूर्व भागात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून पुढील २४ तासांत त्याचे रुपांतर चक्रीवादळात होणार आहे. या वादळाला म्यानमारने तौंते असे नाव दिले आहे. हे वादळ १५ व १६ मे दरम्यान कोकणात धडकण्याची शक्यता आहे. गोव्यासह कोकण किनारपट्टीवरील सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांना सर्वप्रथम या वादळाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे.

त्याचवेळी १६ आणि १७ मे रोजी रायगड, ठाणे पालघर आणि मुंबईत या वादळाचा प्रभाव दिसेल, असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. या दरम्यान वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## ठाणे, कोकण किनाऱ्यावर १५ ते पुढील ५ दिवस मुसळधार पावसाची शक्यता

### समुद्र काठच्या गावांना व मच्छिमारांना सर्तकतेचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

ठाणे,मुंबई कोकण परिसरातील समुद्र किनाऱ्यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन, ४० ते ६० किमी वेगाने वारे सुटणार असून, वादळ सदृश्य परिस्थिती निर्माण होणार आहे. यामुळे नागरिकांनी सतर्क राहून वेळीच उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर शासकीय यंत्रणांनाही सज्ज राहण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत. भारतीय हवामान विभागाच्या सूचनेनुसार १५ मे ते पुढील ५ दिवसांचे दरम्यान पूर्वमध्य आरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन वादळी वाऱ्यासह हलका ते मुसळधार पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असाही इशारा हवामान खात्याने दिला आहे.



सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळसदृश्य परिस्थिती निर्माण होणार आहे. तर यावेळी समुद्राचे पाणी खवळलेले असणार असल्याने, समुद्रातील मासेमारी करण्यासाठी बंदी करण्यात आली आहे. तर समुद्र किनारी असणाऱ्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी घराजवळ कोणतेही सुटे सामान ठेवू नये, कच्या आणि धोकेदायक घरामध्ये राहूनये, वादळसदृश्य परिस्थितीमध्ये घराबाहेर पडू नये, धोकेदायक झाड अथवा पडण्यास आलेल्या फांद्यावर लक्ष ठेवावे.

याशिवाय विद्युत पोल खाली थांबूनये यासारख्या गोष्टींचे पालन नागरिकांनी करावे. तर यावेळी प्रशासनाने जेसीबी, वुडकटर ..../२

## पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । तळा**

सध्या करोना संसर्गाने महाराष्ट्रात थैमान घातले आहे. आरोग्य यंत्रणेवरील ताण प्रचंड वाढला आहे. त्यातच ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात आरोग्य सुविधा मिळत नसल्याचे अनेकदा समोर आले आहे. रुग्णवाहिका नसल्यामुळे रुग्णाला वेळेवर उपचार मिळत नाहीत, असे प्रकारही पाहायला मिळाले आहेत. ही बाब लक्षात घेऊ आ.अनिकेत तटकरे यांनी सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने तळा तालुक्यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका आज दि.१३/५/२१ रोजी तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात देण्यात आली त्याचप्रमाणे सर्व सुविधांनी सुसज्ञ अशा या रुग्णवाहिकांचे लोकार्पण पालक मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते पार पडले आ.अनिकेत तटकरे यांनी मात्र अगदी वेगळ्या पद्धतीने रुग्णवाहिकेचे लोकार्पण केले. फित कापण्याच्या औपचारिकते ..../२



## पनवेल येथे वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी कोविडविषयी मार्गदर्शन आणि मानसिक समुपदेशन सत्राचे आयोजन

### जिल्हा मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल बाळासाहेब भुसारे यांनी केले मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पनवेल येथील कोविड रुग्णालय तथा उपजिल्हा रुग्णालय येथे कोविडविषयी मार्गदर्शन आणि मानसिक समुपदेशन सत्राचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ.बसवराज लोहारे, वैद्यकीय अधिकारी डॉ.सुचिता गवळी, डॉ. राजपूत, डॉ.प्रमोद पाटील आणि इतर वैद्यकीय अधिकारी सह सर्व नर्सिंग स्टाफ सह कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

या सत्राचे प्रमुख वक्ते जिल्हा मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल बाळासाहेब भुसारे यांनी करोना आजार आणि मानसिक समुपदेशन यावर मार्गदर्शन करताना



रुग्णांची आजारादरम्यान असणारी मानसिक स्थिती, त्यासोबतच रुग्णांच्या नातेवाईकांची मानसिक स्थिती, सोशल मीडियाद्वारे मिळणारी अपूर्ण माहिती याचा सविस्तर अभ्यास करून लोकांना करोना रुग्णांशी कसे बोलावे, कोणती माहिती द्यावी, अपेक्षा वास्तव कशा ठेवता आल्या पाहिजेत, कोणत्या गोष्टी टाळल्या गेल्या पाहिजेत, रुग्णांच्या नातेवाईकांना ..../२

## ४५ वर्षावरील नागरिकांना कोविशिल्डचा पहिला व दुसरा डोस मिळणार : सुधाकर देशमुख

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महानगरपालिका कार्य क्षेत्रातील लसीकरण केंद्रावर राज्य शासनाच्या सूचनेनूसार कोविशिल्डचा फक्त दुसरा डोस सर्वत्र दिला जात होता. परंतू राज्य शासनाच्या नव्याने आलेल्या सूचनेनूसार ४५ वर्षावरील नागरिकांना कोविशिल्डचा पहिला व दुसरा दोन्ही डोसचे लसीकरण केंद्रावर उपलब्ध असणार आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ४५ वर्षावरील सर्व नागरिकांनी आपले लसीकरण करून घ्यावे ,असे आवाहन आयुक्त सुधाकर देशमुख यांनी केले आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सध्या सुरू असणारे लसीकरण केंद्र- १.टाटा हॉस्पीटल, खारघर, ..../२

# मोदी ओ मोदी...

एक महिन्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बंगालच्या निवडणुकीत 'दीदी ओ दीदी...' म्हणत ममता बॅनर्जींची केलेली चेष्टा नंतर त्यांच्या चांगलीच अंगलट आली. आज मात्र ममता बॅनर्जींसह देशातील बारा प्रमुख नेते पंतप्रधानांना साद घालत आहेत, ती करोना विरुद्धच्या लढाईत आपले म्हणणे ऐकून घेण्यासाठी. सोनिया गांधी, एच. डी. देवेगौडा, शरद पवार यांच्यापासून ते नुकतेच तमिळनाडूचे मुख्यमंत्री झालेले एम. के. स्टॅलिन यांच्यापर्यंत सगळे पंतप्रधानांना पत्र लिहून या लढाईबद्दल काही सूचना करीत आहेत. त्या पत्रात 'तुम्ही आजपर्यंत आम्ही केलेल्या सूचनांना केराची टोपली दाखविली आहे,' असे नमूद करण्यासही हे नेते विसरलेले नाहीत. नवीन काही नसलेल्या या सूचनांमध्ये बेकारांना महिना सहा हजार रुपये द्या, गरजूंना घरपोच अन्न द्या, येथपासून ते दिल्लीतील सेंट्रल व्हिस्टाचे बांधकाम थांबवा व शेतकरी कायदे कायमस्वरूपी रद्द करा, येथपर्यंत सगळे मुद्दे आहे. त्यातील मोफत धान्य देण्यासारख्या सूचनेची सरकारने दखलही घेतली आहे; पण या सूचना नक्की काय आहेत, यापेक्षा विरोधी पक्ष 'या लढाईमध्ये आम्ही सहभागी होऊ इच्छितो आहोत, आम्हाला सहभागी करून घ्या' हे सुचवित आहेत. ते जास्त महत्त्वाचे आहे. लोकशाहीत विरोधकांचे अनन्यसाधारण महत्त्व असते. राष्ट्रीय आपत्तीत विरोधकांना विश्वासात घेऊन राज्यशकट हाकणे, हे सत्ताधाऱ्यांचे कर्तव्यच असते. वास्तविक, या देशात सर्वाधिक काळ विरोधी पक्ष म्हणून काम केलेल्या भाजपला हे नव्याने सांगण्याची गरज नाही; पण मग असे नक्की काय घडले आहे, की विरोधकांशी संवाद साधून त्यांना विश्वासात घेण्याची गरजही सत्ताधाऱ्यांना वाटत नाही? भारतातील मतदारांना नव्हे, तर नागरिकांना याचे उत्तर मिळाले पाहिजे. मतभेद असले तरीही चालतील; पण मनभेद नकोत, असे एक घासून गुळगुळीत झालेले वाक्य लोकशाहीबाबत नेहमीच सांगितले जाते. या नवीन शतकात भारतीय लोकशाहीचा पोत असा काही बदलतो आहे, की त्यामध्ये विरोधी आवाजाला स्थानच उरलेले नाही. आता नेहमीप्रमाणे डॉ. मनमोहनसिंग यांनी पंतप्रधान असताना विरोधकांशी किती वेळा संवाद साधला, असे मुद्दे काढले जातील. त्यात तथ्य असले, तरीही आपले वेगळेपण दाखवून देण्यासाठी ही सुवर्णसंधी पंतप्रधानांनी साधली पाहिजे. पंतप्रधानांचा मुख्यमंत्र्यांशी दृकश्राव्य माध्यमातून नियमित संवाद असला, तरी विरोधी पक्षाच्या नेत्यांनाही विश्वास देणे लोकशाहीसाठी अतिशय आवश्यक आहे. करोनाबद्दल दीड वर्षापूर्वी कोणालाच काही माहिती नव्हते; त्यामुळे जगभर वापरलेला लॉकडाउनचा उपाय भारतातही वापरला गेला. त्या निमित्ताने आरोग्य व्यवस्था किमान पातळीवर आणण्याचा प्रयत्न झाला; पण पहिली लाट ओसरल्यानंतर सारे करोनाला विसरले. दुसरी किंवा तिसरी लाट ही यापेक्षा मोठी असू शकते आणि त्यासाठी तयारी करणे आवश्यक आहे, हे केंद्रापासून राज्यांपर्यंत सर्व सरकारे विसरली; त्यामुळे दुसऱ्या लाटेने गोंधळ उडविलाच. त्याचबरोबर परदेशातील आपल्या देशाच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम झाला. ती प्रतिमा पुन्हा सावरण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची नितांत गरज आहे. अशा आपत्तीच्या वेळेस तरी राजकारण दूर ठेवून देशहितासाठी सर्व राजकीय पक्ष एकत्र येऊ शकतात, असे चित्र दिसायला हवे. त्याचप्रमाणे निम्म्या भारतीय भूभागावर विरोधी पक्षांची सरकारे सत्तेत असल्याने, त्यांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढे जाणे शक्य नाही, याची जाणीव या निमित्ताने ठेवायला हवी. पी. व्ही. नरसिंह राव यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिवेशनासाठी भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडे सोपविले होते, हा फक्त इतिहासाचा भाग नसून, त्यातून काही तरी शिकण्यासाठीचा तो धडा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. विरोधकांचा टोकाचा तिरस्कार हा पक्षीय राजकारण करताना किंवा निवडणुकीच्या रिंगणात कदाचित शोभत असेल. प्रसंगी त्यामुळे चार मतेही जास्त मिळत असतील; पण देशाचे एकमुखी नेतृत्व करताना तसा विचार करणे योग्य नाही. अर्थात, हे फक्त नरेंद्र मोदींना लागू नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही हे तितकेच लागू आहे. राज्यातील निर्णय घेताना त्यांनीही आजपर्यंत विरोधकांना फार विश्वासात घेतल्याचे चित्र नाही. देशाच्या राजकारणात त्यांचा आवाज ऐकला जाण्याची अपेक्षा असेल, तर त्यांना राज्यात विरोधकांचा आवाज तितक्याच शुद्ध अंत:करणाने ऐकून घ्यावा लागेल. या निमित्ताने करोनासारख्या महासाथीच्या विरोधात लढताना सर्वंकष धोरण तयार करण्याचाही विचार व्हायला हवा. मानवी आयुष्याच्या प्रत्येक परिमाणावर परिणाम करणाऱ्या अशा घटना कधीतरीच घडतात; पण त्या दूरगामी परिणाम करतात. साहजिकच त्यांच्याशी लढताना एकत्र शक्तीने व अनुभवाने, धोरणाच्या आधारे लढले गेले, तर ते अधिक फायदेशीर असेल. मोदी ओ मोदी... ऐकताय ना...

# परिसराचे निर्जंतुकीकरण करून केली छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज १४ मे रोजी साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणाऱ्या अक्षयतृतीया या शुभदिनी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आल्यामुळे दुग्धशर्करा योग जुळून आला होता. कोरोना विषाणूची दुसरी लाट तीव्र स्वरूपात आघात करत असल्यामुळे सध्या टाळेबंदी चे निर्बंध आहेत. त्यामुळे नागरिकांना या दुग्धशर्करा योगाचे निमित्ताने आनंद लुटता आला नाही. छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करत असताना विषाणूच्या संक्रमणाचे भान सुटता कामा नये या भूमिकेतून सकल मराठा समाज पनवेल यांच्यावतीने करंजाडे ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये निर्जंतुक द्रव्यांची फवारणी करून संपूर्ण परिसर निर्जंतुक करण्यात आला.

मराठा क्रांती मोर्चा चे महाराष्ट्र राज्य समन्वयक विनोद साबळे आणि करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक १४ मे रोजी करंजाडे ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये सोडियम हायपोक्लोराइड या निर्जंतुक द्रव्यांची फवारणी करून संपूर्ण परिसर निर्जंतुक करण्यात आला. यावेळी आपली भूमिका मांडताना विनोद साबळे म्हणाले की आपले आदर्श असणाऱ्या राष्ट्रसंतांच्या जयंती अथवा पुण्यतिथी सारखे कार्यक्रम साजरे करत असताना आज समाजावर ओढवलेली परिस्थिती ही नक्कीच ध्यानात घेतली पाहिजे. म्हणूनच आज रोजी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करत असताना आम्ही ती सामाजिक उपक्रमाद्वारे साजरी करण्याचे ठरविले. कोरोना विषाणू संक्रमणाची दुसरी लाट अधिक तीव्र स्वरूपात आपल्यावर आघात करत आहे. त्यामुळे कोरोना निर्मूलनाच्या त्रिसूत्री पैकी सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे परिसर स्वच्छ आणि निर्जंतुक ठेवणे या सूत्राची अंमलबजावणी करण्याचे आम्ही ठरविले. आमची संकल्पना सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्याकडे मांडल्यावर त्यांनी त्वरित या कार्यक्रमास दुजोरा दिला. कोरोना विषाणूच्या निर्बंधांच्या निकषांचे तंतोतंत पालन करत हा कार्यक्रम साजरा होत आहे. त्यानिमित्ताने करंजाडे ग्रामपंचायत हद्दीतील सोसायटी, रस्ते , वस्त्या याठिकाणी निर्जंतुक द्रव्य फवारले जाणार आहे ही समाधानाची बाब आहे.

याबाबत आपली प्रतिक्रिया देताना सरपंच रामेश्वर आंग्रे म्हणाले की समाजोपयोगी कामांतून राष्ट्रसंतांचे जयंती, पुण्यतिथी साजरा करण्याचा आदर्श पायंडा सकल मराठा समाज, पनवेल यांच्यावतीने घालून देण्यात येत आहे. या भूमिकेचे मी स्वागत करतो आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंती दिनी आमच्या ग्रामपंचायत हद्दीचे निर्जंतुकीकरण करून दिल्याबद्दल मराठा क्रांती मोर्चा चे राज्य समन्वयक विनोद साबळे व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार प्रकट करतो.

# कोरोना काळात सुट्टीत लुटला जात आहे पोहण्याचा आनंद



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

दिवसेंदिवस वाढत जाणारी उष्णता व कोरोनामुळे पुकारलेल्या लाँकडाऊनमुळे कुठे जाणे येणे नसल्याने सुट्टीचा उपभोग घेता यावा यासाठी बच्चे कंपनी पोहण्याचा आनंद लुटत असताना दिसत आहेत.

कोरोनाने सर्वत्र हाहाकार उडविल्याने चालू शैक्षणिक वर्षातही शाळांना सुट्टी देऊन मुलांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभरात लॉकडाऊन पुकारल्याने हिंडण्या-फिरण्यावर निर्बंध आले आहेत. तर कोरोनाच्या प्रादुर्भावापासून दूर राहता यावे यासाठी प्रत्येकजण आपापल्या परीने काळजी घेऊन कोरोनाचे नियमावलीचे पालन करताना दिसत आहेत. तर दरवर्षी मे महिन्याची सुट्टी म्हणजे मौजमजेचे सुट्टी ठरते. सुट्टीत विविध बेत आखले जातात. मे महिन्याची सुट्टी आणि मामाचे गाव यांचे तर पुर्वापार ऋणानुबंधनाचे नाते. त्यामुळे सर्रास मुले सुट्टीत मामाच्या गावाला जातात किंवा अन्य नातेवाईक यांच्याकडे जातात. तर काहीजण कुटूंबासोबत दूरच्या प्रवासाला जातात. परंतू गतवर्षपासून कोरोनामुळे सर्वांच्याच हौसेमौजेवर पाणी फेरले असल्याने सुट्टीचा उपभोग घेता यावा यासाठी मुले जमेल त्या वेळेत पोहण्याचा आनंद लुटत असल्याचे दिसून येत आहेत.

तसेच विविध बैठे खेळ, सांघिक खेळ खेळणे, टिव्हीवर आवडत्या मालिका पाहणे, मोबाईलवर गेम्स खेळणे आदी मनोरंजनाचे साधनातून विरंगुळा मिळवित आहेत. तर सांघिक खेळ व क्रुती करताना सामाजिक सुरक्षिततेच्या नियमांचेही पालन करताना दिसत आहेत. या सर्व विरंगुळ्यांच्या साधनात विशेष करून मुले तलाव, नदी, विहिरी आदी ठिकाणी मनसोक्तपणे पोहण्याचा आनंद लुटण्याला पहिली पसंती दर्शवित असल्याचे दिसून येत आहे.

# मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीकरिता पालकमंत्र्यांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र सरकारच्या वतीने जिल्हा स्तरावर राज्य शासनाची विविध कार्यालय एकाच इमारतीत घेण्यासाठी मध्यवर्ती प्रशासकीय इमारती उभ्या करण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे कार्यालय एकाच इमारतीत घेतल्यामुळे नागरिकांना सोयीचे होणार आहे. यासाठी प्रदिप कदम- अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य एनजीओ असोसिएशन, मनोज गावंड- समन्वयक, एनजीओ असोसिएशन कोकण विभाग तथा अध्यक्ष - महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या कडे मागणीचे निवेदन सादर केले. यावेळी पालकमंत्री यांनी शासनाकडे याबाबतचा पाठपुरावा करून मध्यवर्ती इमारत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

यामुळे सामान्य नागरिकांची गैरसोय थांबेल व एकाच ठिकाणी सर्व सरकारी कामे होतील. यामुळे प्रशासनाच्या कामाला गती येईल व रायगड जिल्हाच्या वैभवात भर पडेल.

# अन्न सुरक्षा योजने अंतर्गत तळा येथे मोफत अन्न धान्य वाटप सुरु



**दै.रायगड नगरी । तळा**

राज्य सरकारने कोविंड १९ च्या काळात अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत सर्वांना मोफत अन्न धान्य वाटप करण्याचे आदेश राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना.छगन भुजबळ यांनी दिले आहेत या काळात तांदूळ ३ व गहू २ किलो मोफत वाटपाचे आदेशाचे पालन पुरवठा खात्यामार्फत तळा रास्त भाव धान्य दुकान नं १ व २ मध्ये दि.१२ मे.२१ पासून सुरू करण्यात आले आहे. हि योजना १ मे पासून कार्यान्वित करण्यात आली होती. परंतु कोरोना काळात बायोमेट्रिक मशीन वर ग्राहकाचा थम्स घेण्यात येऊ नये अशी परवानगी शासनाकडून मिळावी यासाठी राज्यभर मागणी करण्यात येऊन शासनाने थम्स घेण्यात येऊ नये असे आदेश देण्यात आल्यानंतर संघटनेने निर्णय घेऊन तालुक्यातून धान्य उचलून वाटप सुरु झाले आहे. मागील वर्षाप्रमाणे या काळात जनसेवा समजून ना नफा ना.तोटा या तत्वावर रेशनदुकानदार आपले चोख कर्तव्य पार पाडीत आहेत. या कालावधीत सर्वांना धान्य वाटप केले जाणार आहे.तरी याची नोंद घ्यावी असे कळवीले आहे.

शासनाने दिलेल्या आदेशानुसार जिल्ह्यात रास्त भाव धान्य दुकानदारांनी मोफत धान्य वाटप सूरू केले आहे.या काळात धान्य मिळेल. आमच्या मागणी प्रमाणे शासनाने थम्स मशीन घेण्यात येऊ नये. अशी परवानगी दिली असल्याने वाटप सूरू करण्यात आले आहे. या काळात शासनाकडे आमचे काही महीने प्रलंबित कमीशन पेंडींग आहे.ते आमच्या हक्काचे असून मिळेलच परंतु हि वेळ शासनाला कोंडीत पकडण्याची असून देखील या काळात सर्वांना धान्य मिळावे या उदात्त भावनेने शासनाला आम्ही सहकार्य करीत आहोत, असे प्रमोद घोसाळकर रायगड जिल्हा अध्यक्ष रास्त भाव धान्य दुकानदार संघटना यांनी सांगितले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## ठाणे, कोकण किनाऱ्यावर १५ ते पुढील ५ दिवस मुसळधार पावसाची शक्यता

मशीनसह अन्य आपात्कालीन उपाययोजना करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. जीवित वा वित्तहानी टाळण्यासाठी आवश्यक ते उपाय करण्यात यावे असेही हवामान खात्याकडून सांगण्यात आले असून, नागरिकांनी या परिस्थितीमध्ये सुरक्षिततेसाठी सतर्क राहण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण

पलीकडे जात रुग्णवाहिका चालवून आ.अनिकेत तटकरे यांनी लोकार्पण पार पाडले. त्यामुळे हा सोहळा लक्ष्यवेधी ठरला.

तळा तालुक्यात आरोग्य सुविधांबाबत लोकांची अनेक गाऱ्हाणी होती. ही बाब ध्यानात घेवून पालकमंत्री अदिती तटकरे यांनी आरोग्य सुविधा वाढवण्यावर भर दिला आहे. स्थानिक विकास निधीच्या पुढे जावून तटकरे कुटुंबीयांकडुन सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानच्या मार्फत आरोग्य सुविधा निर्माण केल्या आहेत. त्याचाच भाग म्हणून सुसज्ज अशी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या करोना रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असताना तळा तालुक्यासाठी सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने रुग्णवाहिका देण्यात आली यासाठी सर्व तळेवासीयांनी पालकमंत्री अदिती तटकरे आणि आ.अनिकेत तटकरे यांचे आभार मानले आहेत या लोकर्पण सोहळ्यासाठी सभापती अक्षरा कदम, उपसभापती गणेश वाघमारे, राजिप महीला बाल कल्याण सभापती गीता जाधव, राजिप सदस्य बबन चाचले, माजी नगराध्यक्षा रेश्मा मुंढे, माजी उपनगराध्यक्षा सायली खातु, नगरसेविका नेहा पांढरकामे नगरसेवक ॲड. चेतन चव्हाण, नगरसेवक चंद्रकांत रोडे, ॲड उत्तम जाधव वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल बिरवडकर, डॉ. गोरेगावकर, डॉ.विद्या घोसाळकर, सौ.मुळे आदि मान्यवर उपस्थित होते.

रायगड जिल्हात सुनिल तटकरे यांचा सामाजिक कार्याचा वारसा मोठा असून त्यांच्या पावलावर पाऊल टाकत त्यांचे पुत्र तथा सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आ. अनिकेत तटकरे हे ही सामाजिक कार्यात तन- मन- धनाने नेहमी तत्पर असतात. सध्या जिल्ह्यात कोरोनाचा थैमान सुरु आहे. ग्रामिण भागातील रुग्णांना शहरात आणण्यासाठी रुग्णवाहिका कमी आहेत. त्यमुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. या बाबीचा सारासार विचार करुन आ.अनिकेत तटकरे यांनी पुढाकार घेऊन रुग्णवहिका तळेवासीयांच्या सेवेत दाखल केली.आ.अनिकेत तटकरे यांच्याकडुन कोरोना काळात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, चक्रीवादळात अनेक शाळांचे नुकसान भरुन काढण्यासाठी केलेली आर्थिक मदत तळेवासी कधीच विसरणार नसुन आज पुन्हा रुग्णवाहिका उपलब्ध करुन ते तळेवासीयांसाठी धावुन आले आहेत त्यांचे मनापासुन आभार व्यक्त केले जात आहेत.

## कोविडविषयी मार्गदर्शन आणि मानसिक समुपदेशन सत्राचे आयोजन

व्यवस्थित आणि परिस्थितीसदृश्य माहिती पोहोचणे किती गरजेचे आहे त्यासोबतच रुग्णांसोबतचा आवश्यक असणारा संवाद, हा रुग्णाची प्रकृती सुधारण्यातला मोठा घटक असून त्यावर सर्वांनी लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

करोना विषाणूचे संकट सुरु झाल्यापासून अखंडपणे २४ तास सेवा देणारे रुग्णालय, त्या रुग्णालयातील सर्व कर्मचारी वर्ग आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यावर शारीरिक आणि मानसिक आलेला तणाव, याविषयी डॉ.भुसारे यांनी वास्तवता, तणावापासून दूर राहण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बसवराज लोहारे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सर्व वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी मानसिक तणावाला सामोरे जात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी या कोविड विषयी माहितीपर मार्गदर्शन आणि मानसिक समुपदेशन सत्राचे आयोजन करण्याचे ठरविले आणि मार्गदर्शनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे तणावाला सामोरे जाऊन आपण कोविड-१९ या आजाराला हरवू शकतो, त्यासोबतच सर्व कर्मचारी खूप चांगल्या पद्धतीने या आजाराला रोखण्याचे कार्य करीत आहेत, असे सांगून उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## पहिला व दुसरा डोस मिळणार : सुधाकर देशमुख

२. आरोग्य उपकेंद्र, रोटरी क्लब सेंटर खांदा कॉलनी, नवीन पनवेल, ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र २ कोळीवाडा, पनवेल, ४. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ४ कळंबोली, ५. टाटा हॉस्पीटल खारघर केंद्र १, ६. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र६, कोमोठे, ७.आरोग्य उपकेंद्र,कर्नाटक समाज हॉल, से.०२नवीन पनवेल, ८. आरोग्य उपकेंद्र, उप प्रभाग समिती कार्यालय,कळंबोली, ९. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र३ नवीन पनवेल, १०. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र१, गावदेवी पाडा,पनवेल ११. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर, १२. आरोग्य उपकेंद्र रामशेठ ठाकूर इंग्लीश मिडीयम स्कूल , कोमोठे,१३ आरोग्य उपकेंद्र रोटरी कम्यूनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्च जवळ नवीन पनवेल.

# कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महानगरपालिका क्षेत्रात विशेष उपाययोजना करण्याचे पालकमंत्र्यांचे आदेश

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आता कोरोनाची देशभरात तिसरी लाट येऊ पाहते. तज्ञ व्यक्तींनी तिसऱ्या लाटेचा त्रास लहान मुले आणि नुकतीच प्रसुती झालेल्या मातांना होणार आहे असा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे आपण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पूर्व खबरदारी म्हणून लहान मुलांच्या आरोग्य तज्ञांच्या सोबत चर्चा करून त्या प्रकारे आरोग्य यंत्रणेचे योग्य नियोजन करून लहान मुलांचे कोविड हॉस्पिटल, कोविड सेंटर, ओपीडी सेंटर सुरू करण्याबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. पनवेल महानगरपालिकेने गंभीरतेने विचार करावा आणि तातडीने ठोस पावले उचलावी अशी सूचना विरोधी पक्षनेते श्री प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केली होती. तसेच सदरचा विषय पत्रव्यवहार करून पालकमंत्री नामदार आदीतीताई तटकरे यांच्याकडे सुद्धा या विषयात त्वरित ठोस पावले उचलण्याचे निर्देश द्यावे अशी विनंती केली होती.

गुरुवार दिनांक १३ मे २०२१ रोजी वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे झालेल्या बैठकीमध्ये खासदार श्रीरंग(अप्पा) बारणे, आमदार बाळाराम पाटील, पनवेल महानगरपालिका आयुक्त सुधाकर देशमुख, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, प्रांताधिकारी दत्तात्रय नवले, प्रांताधिकारी सौ.भोसले मॅडम, पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेवक सतीश पाटील, पनवेल महानगरपालिका प्रशासन, सिडको प्रशासन तसेच पोलीस प्रशासन यांच्या सोबत झालेल्या बैठकीत नामदार आदितीताई तटकरे यांनी लहान मुलांच्या आरोग्य विषयक सेवेमध्ये विशेष उपाययोजनेत पनवेल महानगरपालिका आणि सिडको प्रशासन ह्यांना १००% लहान मुलांचे कोविड सेंटर सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्यात पालकांना देखील राहण्यासाठी सुविधा असाव्यात असे आदेश दिले आहेत. लहान मुलांच्या हॉस्पिटल प्रशासना सोबत बोलून कोविड हॉस्पिटल सुरू करण्याची तयारी करावी येणाऱ्या तिसऱ्या लाटेसाठी तयार राहण्याचे निर्देश दिले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# गोरगरीब जनतेच्या पोटा पाण्याचा विचार करा, जनता कर्फ्यु रद्द करा

## सुधागड रिपाइंचा जनता कर्फ्युला कडाडून विरोध, पाली तहसीलदारांना निवेदन सादर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

गोरगरीब कष्टकरी जनतेच्या पोटा पाण्याचा विचार करा व जनता कर्फ्यु रद्द करा अशी मागणी करीत सुधागड तालुका रिपाइं ने जनता कर्फ्युला कडाडून विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात गुरुवारी दि.(१४ )रोजी पाली तहसीलदार यांना रिपाइं च्या वतीने मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी रिपाइं जिल्हा सरचिटणीस रवींद्र नाथ ओव्हाळ, तालुकाध्यक्ष राहुल सोनावळे, कार्याध्यक्ष भगवान शिंदे, युवक अध्यक्ष निशांत पवार, आदेश मोरे, व पदाधिकारी उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यात कोरोनाचा मोठ्या प्रमाणात उद्रेक दिसून येत होता. मात्र ब्रेक द चैन अंतर्गत कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कडक निर्बंध म्हणून जमावबंदी व संचारबंदी चे आदेश लागू करण्यात आले. त्यामुळे कोरोना रुग्णांची संख्या नियंत्रणात येत आहे. अशातच सुधागड तालुक्यात एकाएकी लागू करण्यात आलेल्या जनता कर्फ्यु ने येथील गोरगरीब आदिवासी कातकरी समाज बांधव तसेच कष्टकरी, श्रमजीवी , मजूर, हातावर पोट असलेल्या घटकांना अनेक समस्या व अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. अनेकांवर उपासमारीची वेळ देखील येणार आहे, अशी भूमिका घेऊन सुधागड तालुका रिपाइं ने जनता कर्फ्युला कडाडून विरोध दर्शविला आहे. जिल्ह्यात कोरोना रुग्णसंख्या घटली आहे, तर मृत्युदर देखील कमी झाल्याचे दिसून येतोय. रायगड जिल्ह्यात मार्च अखेर व एप्रिल मध्ये दैनंदिन रुग्णसंख्या १००० पार होती, मात्र मे महिन्यामध्ये हा आकडा ६०० ते ७०० वर आला आहे, तर मृतांची संख्या देखील कमी होऊन २५ वर आली आहे. कोरोनाला रोखण्यासाठी प्रशासन सज्ज झाल आहे, तर नागरिक देखील स्वतः ची व कुटुंबाची पुरेपूर काळजी घेताना दिसत आहेत, परिणामी सुधागडची वाटचाल कोरोना मुक्तीकडे सुरू असल्याचे रिपाइं सुधागड तालुका अध्यक्ष राहुल सोनावळे म्हणाले. सरकारने अनेक ठिकाणी निर्बंध लावले आ-हेत. त्यामुळे या महामारीस आळा बसेल अशी आशा आहे. सुधागड तालुक्यात अचानक दि. १३ तारखेच्या सायंकाळी बैठक घेऊन दि. १५ मे ते २२ में २०२१ असा जनता कर्फ्यु लावला आहे. सुधागड तालुका हा आदीवासी बहुल तालुका आहे. गेली वर्षभराहुन अधिककाळ येथील जनता या महामारीने होरपळून गेली आहे. गेली वर्षभर येथील व्यापारी ज्या भावाने जिवनावश्यक वस्तु देईल तशी खरेदी करून आपल्या कुटुंबाचा उदर्निवाह करीत आहे. त्यात सुधागड तालुक्यात औद्योगिक कारखाने नसल्याने येथील नागरीक लहान मोठे उदयोग धंदे आणि मोलमजूरी करून गुजरान करीत आहेत. मागील वर्षिच्या लॉक डाऊनने आजतागायत आम्ही शासन नियमांचे पालन केले आहे. या पुढे ही करीत राहु, परंतु सुधागड तालुक्यात एवढा मोठा जनता कर्फ्यु लावण्याची परिस्थीती नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. गोरगरीब नागरीकांना कोणतीही सुचना न देता लावण्यात आलेला जनता कर्फ्यु अन्याय कारक असून यास आमचा विरोध आहे . असे रिपाइं ने म्हटले आहे. जनता कर्फ्यु लावायचाच असेल तर तालुक्यातील गोरगरीब जनतेस आपल्या गावकामगार तलाठी ग्रामसेवक, पोलीस पाटील, कोतवाल, अंगणवाडी सेविका यांचे मार्फत काळ आणि वेळ कळवावी म्हणजे गोरगरीब जनता आपल्या कुटुंबाच्या उदनिर्वाहाची सोय करून ठेवेल, मात्र अशा अचानक ओढवलेल्या प्रसंगाने गरीब जनता भांबावून गेली आहे . याचा प्रशासनाने विचारविनिमय करावा, तसेच या वेळेस संपुर्ण दुकाने, क्रेशर मशिन वाहतुक पुर्णपणे बंद असावी, आम्ही त्या बंद पाडू वेळ प्रसंगी आमच्यावर गुन्हे दाखल झाले तरी चालतील. असा इशारा रिपाइं ने दिलाय. तसेच सरकारने जाहीर केल्या प्रमाणे आजतागायत अन्न धान्याचे व जाहीर केलेल्या पॅकेजचे कोणालाही वाटप झाले नाही ही देखील लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी देखील रिपाईच्या वतीने दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# पशुसंवर्धन खात्यातील अधिकारी आणि कर्मचारी याना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पशुसंवर्धन खात्यातील अधिकारी आणि कर्मचारी याना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने केली आहे.

कोरोनाची जागतिक महामारीची साथ चालू झाल्यापासून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांमध्ये पशुवैद्यकीय सेवाया अत्यावश्यक सेवामध्ये गणल्या जात आहेत. राज्याने ब्रेक द चैनमध्ये सुधा पशुवैद्यकीय सेवा या अत्यावश्यक सेवामध्ये घेतल्या आ-हेत. त्यामुळे कोरोना काळात अखंडित पशुवैद्यकीय सुविधा देताना अनेक अधिकारी कर्मचारी यांना लागण होऊन त्यांचा मृत्यु होत आहे व त्यांचे कुटुंब उध्वस्त होत आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत याचे प्रमाण खूप आहे. आतापर्यत ७०० अधिकारी कर्मचारी यांना कोरोनाची लागण झाली आहे व ३० जणांनी आपला जीव गमावला आहे. दैनंदिन पशुवैद्यकीय सुविधा पुरवतानाच कोरोना नियंत्रण व निर्मूलनाचे काम या विभागाकडून केले जाते. शासनाच्या इतर विभागांना विमा कवच प्रदान करणेत आले आहे. परंतु पशुसंवर्धन खात्याला विमा कवच प्रदान करणेत आलेले नाही.तसेच लसीकरण व औषधोपचार यात इतर विभागांप्रमाणे प्राधान्य देण्यात येत नाही. म्हणजेच काम करताना पशुसंवर्धन विभाग अत्यावश्यक सेवेमध्ये पण लाभ देताना अत्यावश्यक सेवेमध्ये येत नाही. त्यामुले विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना कोविड फ्रंटलाईन वर्कर म्हणून घोषित करावे, विमा कवच/सानुग्रह अनुदान मंजूर करावे, प्राधान्याने लसीकरण करावे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. मात्र शासन दुर्लक्ष करीत असल्याने शेतकऱ्यांची माफी मागुन शेतकऱ्यांना घर पोहोच पशुवैद्यकीय सुविधा बंद करीत आहोत व नियमाप्रमाणे फत्त दवाखान्यातच ५०% क्षमतेने सुविधा पुरविणार आहोत.

# ऑनलाईन करण्यात आली १ लाख ३० हजाराची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फिर्यादी हे त्यांच्या राहत्या घरी असताना त्यांच्या तसेच पत्नीच्या मोबाईल फोनवर अनोळखी इसमाने संपर्क साधून ते सीआरईडी या ॲप्लिकेशनचा कस्टमर एक्झिक्युटीव्ह बोलत असल्याचे सांगून त्यांचा विश्वास संपादन करून या ॲप्लिकेशनमधील इश्श्यु सॉल करण्यासाठी त्यांना त्यांच्या मोबाईलवर दुसरे ॲप्लिकेशन इन्स्टॉल करण्यास सांगून त्याचा पासवर्ड व कोड नंबर घेवून फिर्यादीच्या क्रेडीट कार्डमधील माहिती घेवून व त्याचा वापर करून जवळपास १ लाख २९ हजार ९८४ रुपयाची ऑनलाईन फसवणूक केल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. किशोर गवळी (४२ रा.कामोठे) यांना तसेच त्यांच्या पत्नीला त्यांच्या मोबाईल फोनवर एका अनोळखी इसमाने फोन करून सीआरईडी या ॲप्लिकेशनचा कस्टमर एक्झिक्युटीव्ह बोलत असल्याचे सांगून त्यांचा विश्वास संपादन करून या ॲप्लिकेशनमधील इश्श्यु सॉल करण्यासाठी त्यांना त्यांच्या मोबाईलवर दुसरे ॲप्लिकेशन इन्स्टॉल करण्यास सांगून त्याचा पासवर्ड व कोड नंबर घेवून फिर्यादीच्या क्रेडीट कार्डमधील माहिती घेवून व त्याचा वापर करून जवळपास १ लाख २९ हजार ९८४ रुपयाची ऑनलाईन फसवणूक केल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# तळा शहराची तहान जनरेटर भागवणार ; पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहराला पाणी पुरवठा करत असताना सातत्याने विजेचा पुरवठा खंडीत होत असल्याने किंवा विद्युत पुरवठा कमी दाबाने येत असल्याने पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी अडचण येत होती. अनेकदा विजेच्या लपंडावाने पंप जळण्याचे प्रकार घडले आहेत यामुळे तीन ते चार दिवस शहरातील पाणी पुरवठा खंडीत राहतो. यावर उपाय म्हणुन जनरेटर खरेदी करण्याची मागणी नगरसेवकांनी केली होती. त्या अनुषंगाने तळा नगरपंचायतीने तब्बल छत्तीस लाखांचे तीन जनरेटर चौदा वित्त आयोगातुन खरेदी केले आहेत. हे तीनही जनरेटर पाणी पुरवठा करणाऱ्या अंबेळी पंप हाऊस, धरण पंप हाऊस व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरील पाण्याची टाकी येथे बसविण्यात आले आहेत. आज पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या शुभ हस्ते फीत कापुन हे जनरेटर तळेवासियांसाठी खुले करण्यात आले आहेत.



यावेळी आ.अनिकेत तटकरे, सभापती अक्षरा कदम, उपसभापती गणेश वाघमारे, राजिप महीला बाल कल्याण सभापती गीता जाधव, राजिप सदस्य बबन चाचले, माजी नगराध्यक्षा रेश्मा मुंढे, माजी उपनगराध्यक्षा सायली खातु, नगरसेविका नेहा पांढरकामे नगरसेवक ॲड. चेतन चव्हाण, नगरसेवक चंद्रकांत रोडे, ॲड उत्तम जाधव, मुख्याधिकारी माधुरी मडके, गटविकास अधिकारी व्ही. व्ही.यादव, आदि मान्यवर उपस्थित होते. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ऑटो स्टार्ट प्रमाणे हे जनरेटर १५ सेकंदामध्ये चालू होणार आहेत असे बोलले जात आहे त्यामुळे तळा शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यास मदत होणार असून दररोज किमान अर्धा तास नियमित पाणी पुरवठा होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे. तळा शहर गेल्या अनेक वर्षांपासून पाणी समस्येने ग्रासले आहे, तळा शहराला पाणीटंचाईची समस्या नवीन नाही. पाणीपुरवठा योजना अंतर्गत कोटी रुपये खर्च करून जलवाहिन्या उभारण्यात आल्या. मात्र, त्याचा फारसा उपयोग झाला नाही. शहराची पाणीपुरवठा यंत्रणा आता जुनी झाली आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण ती पेलू शकत नाही. त्यामुळे पुरेसे पाणी असूनही गरजे एवढा उपसा नगरपंचायत करू शकत नाही. विद्युत पुरवठ्यामुळे पाणी कमी आहे,' असे सांगितले जाते, परंतु विद्युत पुरवठा कायमचा सुरळीत सुरु करण्यासाठी ठोस उपाय योजना केली जात नाही. तीन ते चार दिवसांआड पाणी पुरविण्याचे कसब नगरपंचायत पाणीपुरवठा यंत्रणेने गेल्या काही वर्षांत आत्मसात केले आहेत. वावे धरणातुन पाणी पुरवठा प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली गेली. काही दिवसात मुबलक पाणी मिळणार, असे दिवा स्वप्न दाखविण्यात आले. शहरात बॅनरबाजी झाली श्रेयवाद रंगला पण पुढे काय शहराच्या नशिबी पाणी टंचाईचे चटके आलेच. जनरेटर खरेदी करुन पाणी टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न नगरपंचायत प्रशासनाने केला आहे परंतु ही मलमपट्टी किती दिवस चालणार कायमस्वरुपी पाणी टंचाईतुन तळेवासी कधी मुक्त होणार हा प्रश्न अजुनही निरुत्तर आहे?

# सुधागड तालुक्यात शुक्रवारी ११ कोरोना बाधित रुग्णांची नोंद; १५ जण झाले बरे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात शुक्रवारी (ता.१४) ११ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर १५ जण बरे झाले आहेत. सध्या तालुक्यात कोरोनाचे १४० सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १००६ रुग्ण झाले असून ८२४ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ४२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

**उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, जि.रायगड यांजकडून**

# जाहीर नोटीस

**क्र.भूसंपादन/म.ओ.वि,म./इसांबे औद्योगिक क्षेत्र/१८८५/३१/२०२१**

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-तीन) चे कलम एक, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक २३ मार्च २०२१ च्या महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, भाग चार ब पृष्ट क्र. ०१ ते ०९ व वर प्रसिध्द करण्यात आलेली दि.२३ मार्च २०२९ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक आयडीसी. २०२१/(प्र.क्र.१४०)/उ-१४ अन्वये; उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दिष्टीत करण्यात आलेल्या क्षेत्रात सन २०२१ च्या मार्च महातील तेविसाव्या दिवसापासून अंमलात येतील असे महाराष्ट्र शासनाने निदेश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ ज्या क्षेत्रात लागू करण्यात आले आहे व त्यासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या जमिनी समाविष्ट आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमांचे प्रकरण ६ हे ज्या क्षेत्रांना लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रात आणि ज्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यापुढे ज्यांचा उल्लेख महामंडळ असा केला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुष्टयर्थ असेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (ग) आणि (ह) अन्वये काढण्यात आलेली दिनांक ११ जून १९९३ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.आयडीसी/१८९२/(१७४४१)/उद्योग-१४ याव्दारे राज्यशासनाकडील महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ याच्या नियम २८ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त अधिनियमाचे कलमे ३२, ३३ चे उपकलम (२), ३६ व ३८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी सहाय्यक जिल्हाधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करण्याच्या निर्देशानुसार, शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील पत्र क्र.आयडीसी २०२१/(प्र.क्र१४०)/उ.१४ दिनांक २६ मार्च २०२१ अन्वये उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, जिल्हा रायगड यांना प्राधिकृत केलेले आहे.

आणि त्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र/औद्योगिक वसाहत म्हणून विकसित करण्यासाठी किंवा दोन्ही करता सोबतच्या अनुसूचित वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत असे उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, जिल्हा रायगड यांचे मत झालेले आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ३२, पोटकलम (२) अन्वये व उक्त अधिसूचना या खालील राज्य शासनाच्या शक्तीचा वापर करुन मी, वैशाली परदेशी-ठाकूर, उपविभागीय अधिकारी कर्जत, उपविभाग कर्जत, जिल्हा रायगड याव्दारे सोबतच्या अनुसूचित उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये हितसंबंध आणि अधिकार असलेल्या सर्व व्यक्तींना, अनुसूचित उल्लेख केलेल्या जमिनी उक्त प्रयोजनार्थ का संपादन करण्यात येऊ नयेत यासंबंधी सदर नोटीशीच्या प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत खालील सही करणाऱ्यांस लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल फर्मावणारी नोटीस देत आहे.

या नोटीसीच्या तारखेनंतर, मा.जिल्हाधिकारी यांच्या मंजूरीशिवाय विक्री करुन, पट्ट्याने देऊन, गहाण ठेवून, अभिहस्तांकन करुन, अन्य अदलाबदल करुन किंबा अन्य रितीने करावयाच्या जमिनीच्या/जमिनींच्या विल्हेवाटासंबंधी केलेला कोणताही करार किंवा तीवर/त्यावर केलेला कोणताही खर्च किंवा ती/त्या मध्ये केलेल्या सुधारणा या उक्त जमिनीच्या अंतिमत: संपादन करण्यात येतील अशा भागासंबंधी भरपाई निर्धारीत करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोटकलम ५ अन्वये विचारात घेतल्या जाणार नाहीत.

आणि, ज्यांची व्यक्तिगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तिस या नोटीसीच्या तारखेपासून एक महाच्या आंत, भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात कर्जत येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्याऱ्यामार्फत हजर रहाता येईल.

**अनुसूची**

**गांव : इसांबे, ता.खालापूर, जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७ | १ पै | ०.०९५ | ९ | ४१ | ४ ब २ | ०.१०० |
| २ | २७ | २ | ०.५३४ | १० | ४२ | १६ | ०.५१० |
| ३ | २९ | ५ | ०.१८७ | ११ | ४२ | १८ | ०.९९० |
| ४ | २९ | ६ क | ०.३११ | १२ | ४३ | २ | ०.६१० |
| ५ | ३३ | १० अ | ०.२२२ | १३ | ४३ | ८ | ०.३०९ |
| ६ | ३३ | १२ | ०.५५६ | १४ | ४३ | १२ | ०.२५० |
| ७ | ३४ | १ ब | ०.१६० | १५ | ४४ | २ | १.००० |
| ८ | ३६ | ० | ०.५०१ | | एकूण | | ६.३३५ |

**-: चतु:सीमा :-**

**स.नं.२७/१ पैकी व २७/२**
उत्तरेस खारपाडा-सावरोली रस्ता
दक्षिणेस सर्व्हे नंबर २७/३
पूर्वेस सर्व्हे नंबर २७/७
पश्चिमेस सर्व्हे नंबर २१/२ व २१/३

**स.नं.२९/५**
उत्तरेस सर्व्हे नंबर २९/७
दक्षिणेस सर्व्हे नंबर २९/६ पैकी
पूर्वेस सर्व्हे नंबर २९/६+९+१०
पश्चिमेस सर्व्हे नंबर २१/२+३+४

**स.नं.२९/६ क**
उत्तरेस सर्व्हे नंबर २९/५
दक्षिणेस सर्व्हे नंबर २९/८
पूर्वेस सर्व्हे नंबर २९/६ पैकी
पश्चिमेस सर्व्हे नंबर २९/७

**स.नं.३३/१० अ**
उत्तरेस गावठाण, इसांबे हद्द
दक्षिणेस सर्व्हे नंबर ३३/१०ब, ३३/१५
पूर्वेस रस्ता, ३२/१
पश्चिमेस सर्व्हे नंबर ३३/९ व ३३/७

**स.नं.३३/१२**
उत्तरेस सर्व्हे नंबर ३३/११
दक्षिणेस सर्व्हे नंबर ३३/१३
पूर्वेस सर्व्हे नंबर ३३/१५, ३३/१० ब
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४३/२+६, ४३/४

**स.नं.३४/१ ब**
उत्तरेस सर्व्हे नंबर ३४/१०
दक्षिणेस लागू सर्व्हे नंबर ३८
पूर्वेस सर्व्हे नंबर ३५
पश्चिमेस सर्व्हे नंबर ३४/१६

**स.नं.३६/०**
उत्तरेस सर्व्हे नंबर ३७/१+२+६ पैकी
दक्षिणेस सर्व्हे नंबर ३७/१+२+६ पैकी, इसांबे हद्द
पूर्वेस सर्व्हे नंबर ३७/१+२+६ पैकी, इसांबे हद्द
पश्चिमेस सर्व्हे नंबर ३७/१+२+६ पैकी

**स.नं.४१/४ ब/२**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४१/२
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४१/९
पूर्वेस सर्व्हे नंबर ४१/१
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४१/४+६ पैकी

**स.नं.४२/१६**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४२/१४ व ४३/१+११
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४२/१७
पूर्वेस सर्व्हे नंबर ४३/८+९+१०
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४२/१३

**स.नं.४२/१८**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४३/१+११
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४२/२४
पूर्वेस सर्व्हे नंबर ४२/२५ व ४२/२१
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४२/१५ व ४२/१७

**स.नं.४३/२**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४३/२+६ पैकी
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४३/७
पूर्वेस सर्व्हे नंबर ३३/१३ व ३३/१४
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४३/१+११

**स.नं.४३/८**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४३/१+११
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४३/१+११
पूर्वेस सर्व्हे नंबर ४३/१+११
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४२/१४ व ४२/१६

**स.नं,४३/१२**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४४/२
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४२/११ व ४२/१४
पूर्वेस सर्व्हे नंबर ४३/१+११
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४२/९ व ४२/११

**स.नं.४४/२**
उत्तरेस सर्व्हे नंबर ४४/३
दक्षिणेस सर्व्हे नंबर ४३/१+११, ४३/१२
पूर्वेस सर्व्हे नंबर ४३/२+६
पश्चिमेस सर्व्हे नंबर ४२/९, ४४/१

ठिकाण : कर्जत
दिनांक : मे २०२१

**सही/-**
**(वैशाली परदेशी-ठाकूर)**
**उपविभागीय अधिकारी कर्जत**
**उपविभाग कर्जत**

